Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 874 – 879
DOI: 10.5281/zenodo.10282033

Original Research Article

# महात्मा गांधीजींची 3H (Head, Hand, Heart) संकल्पना

आडसुळे आदेश नवनाथ

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर ४१३५१२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: adeshadsule8@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## महात्मा गांधी (इ.स. १८६९ ते इ.स. १९४८)

महात्मा गांधी हे फक्त राजकीय पुढारीच नव्हते, तर त्यांनी धर्म, समाजकारण, अर्थकारण, साहित्य, कला, निसर्गोपचार अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत सखोल चिंतन व प्रत्यक्ष प्रयोग करून त्यांनी त्या-त्या क्षेत्रातील समस्येवर प्रकाश टाकलेला दिसून येतो. शिक्षणाचे क्षेत्रही अर्थात त्यातून त्यांनी वगळलेले नाही. शिक्षणासंबंधी फक्त विचारमंथन न करता त्यांनी संबंध शिक्षणाची योजनाच देशाला सादर केली. टागोरांप्रमाणेच गांधीजीसुद्धा भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृतीचे निष्ठावंत उपासक होते. सुमारे सत्तर वर्षांपूर्वी एक युरोपीयन प्रवासी भारताच्या दौऱ्यावर आले असता पत्रकारांनी त्यांना प्रश्न विचारला की, 'महोदय, आपल्याला या देशात काय काय पाहावयाचे आहे ?' त्यांनी जे उत्तर दिले ते फार समर्पक आहे. तो म्हणाला, 'मला हिमालय, ताजमहाल आणि महात्मा गांधी पाहावयाचे आहेत.' यावरून महात्मा गांधीजींची थोरवी लक्षात येते. भारतीय जनता तर त्यांना 'राष्ट्रपिता' म्हणून वंदन करते. 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' या जगण्याच्या मंत्रामुळे ते 'महात्मा' ठरले आहेत. अशा या थोर युगपुरुषाचा जन्म पारेबंदर या ठिकाणी २ ऑक्टोबर १८६९ मध्ये झाला. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. त्यांचे वडील राजकोट संस्थानचे दिवाण होते. गांधीजींनी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वकिली केली. त्यानंतर ते दक्षिण आफ्रिकेत गेले. तेथे त्यांनी भारतीयांची स्थिती पाहिली आणि त्यांचे जीवनच बदलून गेले. गोरे लोक त्यांना अपमानास्पद वागणूक देत होते. भारतीय लोकांना 'काळे' म्हणून हिणविले जाई. स्वतः गांधीजींनाही रेल्वेच्या डब्यातून हाकलून दिलेला प्रसंग तर सर्वज्ञात आहे

दक्षिण आफ्रिका सरकारच्या वर्ण द्वेषाविरुद्ध लढा उभारून गांधीजींनी सत्याग्रहाचे, अहिंसेचे तत्त्व जगाला दिले. सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, आत्मबल यावर आधारलेल्या सत्याग्रहाला सांस्कृतिक वारसा आहे. त्यांनी सत्यास आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व दिले. आपल्या जीवनात त्यांनी सत्याचे प्रयोग केले. त्यांचे The Story of my

experiments with truth हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. 'सत्य' आणि 'अहिंसा' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अहिंसा हे ध्येय असून, सत्याने वागणे हा त्या ध्येयाप्रत जाण्याचा मार्ग आहे असे ते म्हणत. नैतिक जीवन हा त्यांच्या जीवनाचा आधार होता. त्यामुळे स्वतःचे वर्तन नियंत्रित करता येते. सत्याग्रहीच्या मनात अन्यायाची चीड असली तरी अन्यायी व्यक्तीविरुद्ध द्वेष नसतो. त्याच्या मनामध्ये प्रेम, करुणा असते. यातून सत्याचाच विजय होतो असे ते म्हणत. त्यांच्या 'Diet & Diet reform' 'Hind Swaraj' अशा अनेक ग्रंथसंपदा आहेत. ते आपल्या 'Hind swaraj' या पुस्तकात ब्रिटिशांबद्दल म्हणतात की, 'They came in India not because of their power but of our weaknesses.' आपल्यामध्ये ज्या उणिवा आहेत त्या दूर करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती.

**अ) मनुष्याचा स्वभाव व समाज (जीवनविषयक तत्त्वज्ञान)**

माणूस म्हणजे नुसती बुद्धिमत्ता, शरीर, मन, आत्मा नव्हे, तर त्यांच्या एकात्मीकरणातून मनुष्य घडतो, तयार होतो असे गांधीजी म्हणत. मन, शरीर, आत्मा यांचे एकत्रितपणे कार्य किंवा सुसंस्कार झाला नाही, तर समाजसेवेसाठी मनुष्याचा वापर होऊ शकत नाही. 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' हा जीवनाचा मंत्र असावा. मनुष्याचे सुसंवादी व्यक्तिमत्त्व तयार होण्यासाठी बुद्धीने ध्येय ठरवावे, मनाने साथ द्यावी व आत्म्याने दिशा द्यावी असे गांधीजी म्हणतात. म्हणून माणसाकडे बुद्धिमत्ता, विवेकशक्ती आहे. त्यामुळेच तर तो इतर पशूंपेक्षा भिन्न आहे. तसा तो व्यक्ती म्हणून क्षुद्र असला, तरी तो ईश्वराचा अंश आहे. मनुष्याची निर्मिती पंचमहाभूतांपासून झाली आहे. मानवी जीवनाचे ध्येय स्वतःबरोबर ईश्वराला जाणणे हे असले पाहिजे, असे गांधीजी सांगत. त्यांच्या मते, मानवाने शरीराचा वापर जगाची सेवा करण्यासाठी किंवा आत्मसंयम ठेवून केला, तर शरीराचा सदुपयोग होतो अन्यथा दुरूपयोग होतो. त्यामुळे स्वत:साठी जगू नका असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. समाजामध्ये राहाताना मनुष्याने आपण वेगळा घटक आहोत अशी धारणा करू नये. कारण एकट्याचे अस्तित्व लवकर संपून जाते. म्हणून ते म्हणत की, 'Service of poor, service to mankind is the way to God realization.' ताकदवान समाजाची निर्मिती व्हायची असेल तर प्रत्येक मनुष्याने ताकदवान सामर्थ्यवान व्हावयास हवे. सर्व स्वीकारताना मला माझी संस्कृती टिकविता आली पाहिजे. गरजांचे गुलाम होता कामा नये तर गरजांवरती विजय मिळविता आला पाहिजे. आपण जर गरजांचे गुलाम झालो, तर विचारशक्ती नष्ट होते अशी त्यांची धारणा होती.

**ब) शिक्षण व शाळा यासंबंधी मांडलेले विचार**

गांधीजींच्या मते, शिक्षण म्हणजे शरीर, मन आणि आत्मा 3H (Head, Hand, Heart) यांचा विकास होय. ‘By education, I mean to develop body, soul & spirit.' अशी शिक्षणाची व्याख्या त्यांनी केली आहे. केवळ साक्षर होणे म्हणजे शिक्षण नव्हे. व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास साधणे हेच शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. थोडक्यात, 'शिक्षण म्हणजे माणूस घडविणे होय.' असे गांधीजींचे मत होते.

गांधीजींच्या शैक्षणिक विचारांत निसर्गवाद, आदर्शवाद व कार्यवाद यांच्या विचारसरणीचे प्रतिबिंब पडलेले दिसते. पाठ्यपुस्तकी शिक्षणास महत्त्व न देता कृतियुक्त शिक्षणाचा पुरस्कार त्यांनी केला. शिक्षणाची कामगिरी ही चतुर्विध असली पाहिजे. यासाठी शिक्षणाचे चार पैलू त्यांनी दर्शविले.

१. शैक्षणिक प्रयोग
२. अन्य शैक्षणिक संस्था व व्यक्तींना मार्गदर्शन
३. शैक्षणिक विचार व्यक्त करणे
४. समाज-शिक्षणासाठी लोकशिक्षक तयार होणे.

अशी चौफेर कामगिरी शिक्षणाने केली पाहिजे, असे त्यांचे मत होते. शाळेसंबंधी विचार मांडताना त्यांनी फक्त विचारच पुढे केले नाहीत, तर वर्धा शिक्षण योजना / बुनियादी तालीम / नयी तालीम / मूलोद्योगी पद्धती यामार्फत शाळेचा एक आदर्श नमुनाच आपल्यासमोर ठेवला आहे. याद्वारे 'खेड्याकडे परत चला' हा मंत्रही त्यांनी दिला. त्यांनी आपली शिक्षणपद्धती मूलोद्योग पद्धती (Craft centred) व क्रियात्मक शिक्षण (Learning by doing) अशी विकसित केली. १९३७ मध्ये वर्धा येथे शिक्षणतज्ज्ञांची परिषद बोलावून त्यांच्यापुढे गांधीजींनी आपली योजना मांडली. १९०४ मध्ये त्यांनी फोनिक्स आश्रमाची स्थापना केली होती. १९११ मध्ये स्थापन झालेल्या टॉलस्टॉय फार्मवर, १९२१ मध्ये स्थापन झालेल्या गुजरात विद्यापीठात व साबरमती आश्रमात त्यांचे शिक्षणविषयक प्रयोग चालूच होते. त्यातून राष्ट्रीय शिक्षणाची एक व्यापक योजना म्हणून 'वर्धा शिक्षण योजना' अस्तित्वात आली. या योजनेलाच मूलोद्योगी शिक्षण, बुनियादी शिक्षा, नयी तालीम, बेसिक शिक्षण आणि अखेर नवीन शिक्षण हे नाव प्राप्त झाले.

'बेसिक' याचा अर्थ 'पायाभूत' असा होतो. सक्तीचे, मोफत पण स्वतःचे जीवन स्वावलंबनाने जगण्यास समर्थ बनविणारे शिक्षण कमीतकमी खर्चात व लवकरात लवकर देणारी ही योजना होती. उद्योगांद्वारा बुद्धीचा व चारित्र्याचा विकास हे तिचे प्राणतत्त्व होते.

या शिक्षणयोजनेत मातृभाषेचा अभ्यास व मातृभाषा हेच माध्यम होते. राष्ट्रभाषा भाषा हिंदी, अंकगणित, निसर्ग परिचय, समाज परिचय, चित्रकला, संगीत या विषयांचा अंतर्भाव होता. याशिवाय उत्पादक उद्योगाच्या माध्यमातून शिक्षण स्वाश्रयी, स्वयंपूर्ण व स्वावलंबी व्हावे अशी गांधीजींची अपेक्षा होती. यासोबत ललितकला, विणकाम, मातकाम, सूतकताई इ. हस्तोद्योग होते. यास पूरक म्हणून राष्ट्रीय सण, उत्सव, साक्षरता, ग्राम सुधारणा, सामुदायिक प्रार्थना इ. कार्यक्रम सुचविले आहेत.

**क) शिक्षणाची ध्येये**

शिक्षणाची ध्येये सांगत असताना ती दोन प्रकारची असतात असे गांधीजी म्हणतात. (अ) तात्कालिक ध्येये, (ब) अंतिम ध्येये.

**अ) तात्कालिक ध्येये**

१. चारित्र्यनिर्मिती करणे :
२. सर्वांगीण विकास करणे :
३. सांस्कृतिक शिक्षण देणे :
४. अर्थोत्पादनक्षम शिक्षण देणे

चारित्र्य निर्मिती म्हणजे विविध गुणांची जोपासना करणे होय.

विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक व बौद्धिक तसेच आध्यात्मिक विकास होणे अपेक्षित आहे. सांस्कृतिक वारसा जपणे व तो पुढच्या पिढीकडे संक्रमित करणे.

सर्व नागरिकांनी स्वावलंबी होणे आवश्यक आहे. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहून कुटुंबाचे पालनपोषण करून समाज व राष्ट्रविकासात योगदान द्यावयाचे आहे. यासाठी व्यावसायिक शिक्षण दिले पाहिजे.

**ब) अंतिम ध्येये**

१. सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे : व्यक्ती आणि समाज यांचे नाते अतूट आहे. दोघांचे अस्तित्व व प्रगती एकमेकांवर अवलंबून आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये ही जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे.
२. आध्यात्मिक विकास साधणे : जीवनाचे व शिक्षणाचे अंतिम ध्येय यात फरक नसावा. आदर्शाला व्यावहारिकतेची जोड समन्वयातून अपेक्षित आहे.

**क) अध्ययन व अध्यापन पद्धती**

महात्मा गांधींनी तीन पद्धतींची शिफारस केली आहे

१. कृतीद्वारा शिक्षण: कृतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांच्या कृतीला भरपूर वाव असावा. ज्ञानेंद्रियांमार्फत अनुभव - ग्रहणाची क्रिया होणे अपेक्षित आहे.
२. स्वानुभवातून शिक्षण: लहान मूल जेवढे जास्तीत जास्त अनुभव घेईल तेवढे त्याचे ज्ञान व्यापक होईल. जास्तीत जास्त अनुभव घेण्याची संधी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावी. अनुभवांचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर कोरला जावा.
३. समवायातून शिक्षण: विविध विषयांचे ज्ञान स्वतंत्रपणे, तुटकपणे देण्याऐवजी ते सलग व एकसंध आहेत याची जाणीव शिक्षकांना हवी म्हणजेच विविध विषय, जीवन आणि शिक्षण यांत समन्वय प्रस्थापित करावा. गरजेनुसार, व्याख्यान, चर्चा या पद्धतींचा वापर करावा.

**शिक्षणक्षेत्रातील योगदान**

एकंदरीत शिक्षणाची योजना मांडताना गांधीजींनी धार्मिक शिक्षण, स्त्री-शिक्षण, प्रौढशिक्षण, आदर्श समाज यासंबंधी आपले विचार मांडले. धर्माकडे व्यक्तीने उघड्या डोळयांनी पाहावे. अंधानुकरण करू नये, पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण द्यावे, प्रौढ शिक्षणामार्फत निरक्षरता ही समस्या दूर व्हावी, स्वयंशिस्तीचे पालन केले जावे असे सर्वांगांनी त्यांनी आपले विचार मांडले. आदर्श समाजाची निर्मिती करण्यासाठी सर्वांना समान संधी, संपत्तीचे विकेंद्रीकरण, स्वातंत्र्य, स्वावलंबन यांचा आधार घ्यावा असेही त्यांनी सांगितले आहे. प्रचलित शिक्षणपद्धतीमध्येगांधीजींचे विचार खालील मुद्द्यांना अनुसरून उपयुक्त ठरलेले आपणास दिसून येतात.

१. शिक्षणामध्ये सर्वांना समान संधी दिली जाऊ लागली.
२. हस्तोद्योग किंवा व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार झाला.
३. कृतींद्वारे शिक्षण देण्याची पद्धती रुढ होऊ लागली.
४. स्वानुभवांना महत्त्व (आताचा ज्ञानरचनावाद ) दिले जाऊ लागले.
५. विविध विषयांतील ज्ञानामध्ये समवायाचे तत्त्व अंगिकारले.

६. स्वावलंबी शिक्षण योजना अस्तित्वात आली.

**समारेप**

**शिक्षणाचे तत्वज्ञान**

शिक्षणाविषयीचे गांधींचे विचार हे प्रदीर्घ वर्षांच्या चिंतनाचे आणि अनुभवाचे परिणाम आहेत. त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान त्यांच्या जीवनाच्या सामान्य तत्त्वज्ञानातून आणि भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, नैतिक आणि आध्यात्मिक पुनरुत्थानाचे साधन म्हणून शिक्षणावरील विश्वासातून उदयास आले. गांधी सत्य, अहिंसा आणि न्याय यांच्याभोवती विणलेल्या सामाजिक व्यवस्थेसाठी उभे होते.

गांधींचा शिक्षणाच्या एकात्मिक दृष्टिकोनावर विश्वास होता. त्यांचा असा विश्वास होता की मुलामध्ये अनेक जन्मजात क्षमता असतात ज्यांना शैक्षणिक प्रक्रियेतून फुलवायला हवे. शिक्षणाद्वारे मुलांचा शारीरिक, सामाजिक, बौद्धिक, भावनिक आणि आध्यात्मिक विकास होण्यास मदत होते. शिक्षणाने सांस्कृतिक वारसा प्रसारित केला पाहिजे, वंशजांच्या फायद्यासाठी ते परिष्कृत आणि समृद्ध केले पाहिजे. तथापि, शिक्षण हे जीवन आणि जीवनातूनच असले पाहिजे यावर ते भर देतात.

शिक्षणाद्वारे स्वावलंबन हे गांधींचे ध्येय होते. त्यांनी मुलभूत शिक्षण योजना सुरू केली ज्यात हस्तकलेच्या प्रशिक्षणासह हस्तकलेचे प्रशिक्षण मुलांना देण्यात आले जेणेकरून ते स्वावलंबी होऊ शकतील आणि श्रमाचा सन्मान शिकू शकतील. उदरनिर्वाह करण्याची क्षमता हा या स्वातंत्र्याचा भाग आहे. गांधींसाठी, शिक्षणाचा सांस्कृतिक पैलू त्याच्या साक्षरतेच्या पैलूपेक्षा कितीतरी जास्त महत्त्वाचा आहे आणि चांगल्या चारित्र्याशिवाय ज्ञान निरुपयोगी आहे. तो टिप्पणी करतो. व्यक्ती आणि राष्ट्राचे कल्याण हे एकमेकांना पूरक आहे. गांधींच्या मते शाळा ही एक लहान लोकशाही समाज आहे ज्यामध्ये मुलांवर लोकशाही मूल्यांचे संस्कार केले जातात. समाजातील शोषण आणि केंद्रीकरण मुळापासून उखडून एक अहिंसक समाजव्यवस्था निर्माण करणारी शिक्षण व्यवस्था असावी. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी अहिंसेच्या तत्त्वावर जोर दिला. तो अहिंसा हा एक महान मानवी गुण मानतो. गांधीवादी तत्त्वज्ञानाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सर्वोदयाचे उद्दिष्ट म्हणजे संपूर्ण समाजाचे कल्याण होय.

त्यामुळे त्यांनी प्रौढ आणि स्त्री शिक्षणासह देशासाठी विविध प्रकारच्या शिक्षणाची योजना आखली. दुसऱ्या शब्दांत त्यांचा जीवनकेंद्रित तसेच बालकेंद्रित शिक्षणावर विश्वास होता. शाळेत तीन आर (वाचन, लेखन आणि अंकगणित) शिकण्याबरोबरच, हात, हृदय आणि डोके या तीन एचच्या विकासावर त्यांनी आग्रह धरला. गांधींच्या मते, शिक्षणाचे उद्दिष्ट संपूर्ण माणूस घडवणे आणि त्याचे अविभाज्य व्यक्तिमत्व विकसित करणे हे असले पाहिजे. "शिक्षणाचा अर्थ असा आहे की मूल आणि पुरुष, शरीर, मन आणि आत्मा यांच्यातील सर्वोत्कृष्ट चित्र काढणे. साक्षरता हा शिक्षणाचा शेवट किंवा अगदी सुरुवातही नाही. हे एक साधन आहे ज्याद्वारे स्त्री आणि पुरुष करू शकतात. शिक्षित व्हा. साक्षरता हे स्वतःच शिक्षण नाही."

या सर्व गोष्टी सद्यस्थितीतील शिक्षणामध्ये उपयोगी पडत असलेल्या आपणांस दिसून येतात. गांधीजींची मूलोद्योगी शिक्षणपद्धती आज जरी अस्तित्वात नसली, तरीही तत्त्वांचा अवलंब सर्वत्र होताना दिसतो आहे. गांधीजींच्या या विचारांमुळे शिक्षण जीवनाभिमुख व समाजाभिमुख होण्यास मदत झाली आहे.

**संदर्भ सूची**

१. अभ्यासक्रमांतर्गत भाषा ज्ञान आणि अभ्यासक्रम (Language Across the Curriculum Knowledge and Curriculum) :- **Dr Shailaja Bhangale.**

२. Mahatma Gandhi Educational Thoughts (Paper 1-Educational Thoughts and Practices Unit 1-Educational Thoughts of Indian Thinkers For B.A Education (Semester -4):- **Dr. Kaneez Mehdi Zaidi Assistant Professor Department of Education Shia P.G. College Lucknow.**